महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
उप प्रादेशिक कार्यालय, सातारा

फोन नं:- (०२१६२) २३३५२७
ईमेल-srosatara@mpcb.gov.in

नवीन प्रशासकीय इमारत,
दुसरा मजला,
एस.टी.स्टॅन्ड पाठीमागे,
सदरबझार, सातारा- ४१५००१

जा.क्र.उप्राकासा/तांशा/ — /190625-FTS-0173 दिनांक:- 25/06/2019

संदर्भ-

१) जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ व सुधारीत नियम २०१८.
२) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३ दि.०४/०४/२०१९.
३) केंद्र शासनाने जारी केलेली दि.२८/०३/२०१६ रोजीची नवीन नियमावली.

# आदेश

## जैविक वैद्यक कचरा (BMW)बाबत जिल्हास्तरीय सल्लागार समिती

शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३ दि.०४/०४/२०१९ मध्ये नमूद केलेप्रमाणे जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ मधील निमय ११(११) नुसार अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यास संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे, सदर अधिनियम अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारण झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम राज्यस्तरीय सल्लागार समितीचे आहे. राज्य स्तरीय सल्लागार समितीप्रमाणेच जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती कामकाज पाहिल असे या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन करणे आवश्यक असल्याने, खालील जैविक वैद्यक कचरा (BMW)बाबत जिल्हास्तरीय सल्लागार समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा शल्यचिकित्सक | सदस्य |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ४ | जिल्हा नगरप्रशासन अधिकारी | सदस्य |
| ५ | आरोग्य अधिकारी, नगरपालिका | सदस्य |
| ६ | प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य सचिव |
| ७ | इंडीयन मेडिकल असोशिएशन | प्रतिनिधी |

जिल्हाधिकारी, सातारा